<u>रे.दि.मु.क्र.४००/२०२३</u>

बाबुराव थोरात

वि.

**शिवाजी थोरात**

<u>**रे.दि.मु.नं.४००/२०२३ मधील निशाणी २९ खालील आदेश**</u>

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र २ यांचेविरुद्ध विनाकैफियत झालेला आदेश रद्द होवुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र २ यांचे म्हणण्यानुसार, दाव्यास कैफियत दाखल करणेस उशीर झाला आहे. तरी प्रतिवादीस कैफियत दाखल करणेची असुन झालेला आदेश रद्द करणेची विनंती केली आहे.

०३. उलटपक्षी वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन, प्रतिवादीस दि. १२.०६.२०२३ रोजी समन्सची बजावणी झालेली होती. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रतिवादी क्र २ खर्च रक्कम रुपये ५०००/– कॉस्ट वादीस देणेचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. वादीने सदरचा दावा प्रतिवादी क्र २ विरुध्द निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र २ वेळेत कैफियत दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द दि. ०२.११.२०२३ रोजी विना कैफियत आदेश करण्यात आला होता. त्यांना कैफियत दाखल करणेस साधारणतः ४ महिन्यांचा उशीर झालेला आहे. असे असलेतरी अर्जात नमुद कारणांचा

विचार करीता तसेच दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादी क्र २ ची  कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करुन घेतले नाहीतर प्रतिवादी क्र २ चे  अपिरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादी क्र २ यांना  त्यांची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र २ यांचेवर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र २  नि. २९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र २  खर्च रक्कम रुपये ४००/-( चारशे रुपये मात्र) लादून विनाकैफियत झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र २ कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

४. प्रतिवादी क्र २  पुढील तारखेपर्यंत लादलेली खर्चाची रक्कम जमा  न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

PRAJAKTA GAJANAN SHELAR

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2024.07.31 11:35:31 +0530

स्थळ – कराड  (पी. जी. शेलार)

दिनांक–३०.०७.२०२४  ६ वे  सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड